दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २१२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.२ नोव्हेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## ठाकरे-शिंदेंमधील वाद आता थेट पुण्यातील रस्त्यांवर

**दै.रायगड नगरी । पुणे**

राज्यात शिंदे-फडणवीस सरकार स्थापन झाल्यानंतर अनेक उद्योग इतर राज्यांमध्ये गेल्याच्या आरोपांमुळे राज्यातील राजकारण चांगलंच तापलं आहे. याचे पडसाद पुणे शहरातही उमटल्याचं पाहायला मिळत आहेत. पुण्यात ठाकरे आणि शिंदे गटाच्या युवासेनेकडून एकमेकांच्या विरोधात बॅनरबाजी करण्यात आली आहे. शिंदे गटाकडून 'उद्धवचा वाटा, महाराष्ट्राचा तोटा' अशा आशयाचं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा एकेरी उल्लेख करत पुण्यातील बालगंधर्व चौकात बॅनर्स लावले होते. यालाच उत्तर देत ठाकरे गटाकडून देखील बाजीराव रस्त्यावर बॅनर लावत शिंदे-फडणवीस सरकारचा समाचार घेण्यात आला आहे. राज्याबाहेर गेलेल्या प्रकल्पांमध्ये नव्हता मिळत वाटा म्हणून गद्दारांनीच केलाय महाराष्ट्राच्या तरुणाईचा घाटा, असे बॅनर ठाकरे गटाच्या युवासेनेकडून लावण्यात आले आहेत. महाराष्ट्रात येणारा टाटा एअर बस प्रकल्प, त्याचबरोबर वेदांता-फॉक्स्कॉन, मेडिकल डिवाइस, बल्क ड्रग पार्क असे अनेक उद्योग जे महाराष्ट्रात गुंतवणूक करणार होते, परंतु नवीन सरकार आल्यानंतर हे सर्व उद्योग प्रामुख्याने गुजरात राज्यामध्ये जास्त प्रमाणात गेले.

# पनवेल प्रांताची हेराफेरी लपविण्यासाठी माहितीच्या अधिकाराखाली माहिती देण्यास टाळाटाळ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल प्रांत कार्यालयातील जमिनीच्या झालेल्या निकालाबाबत माहिती दै.रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार यांनी मागविली होती. परंतु माहिती देण्यास एक महिना उलटून गेल्यानंतर पनवेल प्रांत कार्यालयातून रायगड नगरीच्या संपादकांना कळविण्यात आले की, अशा प्रकारची माहिती देता येत नाही, याचाच अर्थ पनवेल प्रांतांनी गेल्या एक वर्षात आपल्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात हेराफेरी केली असल्याचा दाट संशय निर्माण होत असून म्हणूनच माहिती देण्यास टाळाटाळ केली जात आहे.**

पनवेल प्रांत हे पनवेल प्रांत कार्यालयाचा कारभार हाती घेतल्यावर त्यांनी जमिनीच्या मोठ्या प्रमाणात हेराफेरी करून लाखो रुपये कमविले असल्याची चर्चा पनवेल परिसरात तसेच उरण परिसरात सुरू ओह. पनवेल प्रांत हे यापुर्वीही जेथे होते तेथेही त्यांनी जमिनीच्या व्यवहारात मोठ्या प्रमाणात हेराफेरी करून अब्जावधी रुपयाची माया जमा केल्याची चर्चा आहे. वाम मार्गातून कमाविलेली संपत्ती ही बेहिशोबी असून त्याचा हिशेब घेणे क्रमप्राप्त आहे. म्हणून ईडी सारख्या तपास यंत्रणेने पनवेल प्रांतांची सखोल चौकशी करावी अशी मागणी पनवेल आणि उरण तालुक्यातील जनतेमधून केली जात आहे.

**सविस्तर वृत्त उद्याच्या अंकी भाग-२**

पनवेल प्रांत हे एका माजी मंत्र्यांच्या निकटवर्तीय असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. त्यामुळेच त्यांनी अशा प्रकारच्या हेराफेरी केलेल्या असून देखील त्या दाबण्यात आलेल्या आहेत. म्हणूनच पनवेल प्रांतांची सखोल चौकशी व्हावी आणि जमिनीच्या व्यवहारात ज्यांच्यावर अन्याय झाला आहे त्या सर्वांना नव्या सरकारने चौकशी करून न्याय द्यावा अशी मागणी शेतकरी वर्गाकडून केली जात आहे.

## महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा निकाल पुन्हा लांबणीवर, सुप्रीम कोर्टाचा महत्त्वाचा आदेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ठाकरे गट आणि शिंदे गटातील वादामुळे महाराष्ट्रात निर्माण झालेल्या सत्तासंघर्षाची सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी पुन्हा एकदा लांबणीवर पडली आहे. सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणीला सुरुवात झाल्यानंतर घटनापीठाने दोन्ही पक्षकारांना लिखित स्वरुपात बाजू मांडण्याचे आदेश दिले. त्यासाठी घटनापीठाने तीन आठवड्यांची मुदत देऊ केली आहे. या मुदतीत ठाकरे गट आणि शिंदे गटाला न्यायालयात ही कागदपत्रे सादर करावी लागतील. त्यानंतर २९ नोव्हेंबरला पुढील सुनावणी होईल. यानंतरच्या काळात घटनापीठाकडून याप्रकरणाची सलग सुनावणी घेतली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता पुढील सुनावणीपर्यंत ठाकरे गट आणि शिंदे गट आपापली कायदेशीर बाजू कशाप्रकारे भक्कम करणार, हे पाहावे लागेल.




आजच्या सुनावणीनंतर ठाकरे गटाचे नेते अनिल देसाई यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी सांगितले की, याप्रकरणाची सुनावणी महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थ्यांच्या निवडणुकीपूर्वी यासाठी आम्ही आग्रही आहोत. याप्रकरणात जाणुनबुजून वेळकाढूपणा केला जात आहे का, अशी शंका काहीजण उपस्थित करत आहेत. त्यावरही आज न्यायमूर्तींकडून स्पष्टीकरण देण्यात आले. या प्रकरणाचा निकाल लोकशाहीच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे काही गोष्टी व्यवस्थितरित्या करणे गरजेचे आहे, असे घटनापीठाकडून सांगण्यात आले.

राज्यातील सत्तासंघर्षावरील सुनावणासाठी स्थापन करण्यात आलेल्या घटनापीठामध्ये न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती एम. आर. शहा, न्यायमूर्ती कृष्ण मुरारी, न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती पी. नरसिंहा यांचा समावेश आहे. सर्वोच्च न्यायालयात १६ आमदारांवरील अपात्रतेच्या कारवाईसाठी तत्कालीन विधानसभा अध्यक्षांनी दिलेली नोटीस आणि त्याला देण्यात आलेले आव्हान, तसेच नंतर उद्भवलेले विविध कायदेशीर विवाद यावरील सुनावणी प्रलंबित आहेत. यापूर्वी ऑक्टोबर महिन्यात याप्रकरणाची सुनावणी झाली होती. नंतरच्या काळात अनेक सुट्ट्या असल्याने ही सुनावणी १ नोव्हेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली होती. त्यामुळे जवळपास एक ते सव्वा महिन्याच्या खंडानंतर सत्तासंघर्षाच्या प्रकरणाबाबत सुनावणी झाली. मात्र, आता याप्रकरणाची सुनावणी आणखी चार आठवड्यांनी लांबणीवर पडली आहे.

यापूर्वीच्या सुनावणीत घटनापीठाने शिवसेनेच्या पक्षचिन्हाचा निर्णय निवडणूक आयोगाकडे सोपवून ठाकरे गटाला एकप्रकारे धक्का दिला होता. घटनापीठाने मुभा दिल्यानंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे पक्षचिन्ह गोठवले होते. त्यामुळे शिवसेनेला मशाल हे नवे चिन्ह घ्यावे लागले होते. अनेक वर्षांपासूनची ओळख पुसली गेल्याने आता शिवसेनेसमोर (ठाकरे गट) नव्याने मतदारांपर्यंत पोहोचण्याचे आव्हान असेल.

## जंजिरा किल्ल्याला ब्रेक वॉटर जेट्टीची सुविधा होणार

**एकावेळी शेकडो पर्यटक उतरण्याची शमता**



**दै.रायगड नगरी । मुरुड**

जगप्रसिद्ध जंजिरा किल्ला पाहण्यासाठी लाखो पर्यटक येत असतात. या किल्लयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर लाटांचा मारा असतो मोठ्या भरतीच्या वेळी पर्यटकांना उतरताना कसरत करावी लागते. त्यामुळे गेल्या कित्येक वर्षांपासून वारंवार जेट्टीची मागणी होत आहे. आधी तरंगतती जेट्टी होणार होती. परंतु मुख्य प्रवेशद्वारावर जेट्टी बनविल्याने किल्लयाच्या सौंदर्याला गालबोट लागण्याची शक्यता वर्तवली जात होती. या बाबींचा विचार करून किल्लयाच्या मागील बाजूस ब्रेक वॉटर बंधारा बांधून जेट्टी बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे पर्यटकांना किल्यात प्रवेश करणे सुखकारक होणार व एकावेळी शेकडो पर्यटक उतरण्याची शमता असणार आहे.

जंजिरा किल्ला पर्यटकांचे मुख्य आकर्षण आहे. किल्लयात शिडाच्या बोटीने गेल्यावर प्रवेशद्वारावर उतरणं व चढणं पर्यटकांसाठी मोठे जिकिरीचे होते. त्यासाठी मागील सहा वर्षांपासून किल्लयात जाण्यासाठी तरंगतती जेट्टी बांधण्याची मागणी करण्यात आली होती. पुरतत्व खात्याच्या अनेक परीक्षणांनंतर या ठिकाणी ९३.५६ कोटी रुपये खर्चून जेटी व ब्रेकवॉटर बंधाऱ्याचे काम करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कामाची निविदा २७ ऑक्टोबरला .../२

## धूतपापेश्वर ते दगडी शाळा येथे पिण्याच्या पाण्याची नवीन पाईपलाईनचे परेश ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या पाठपुरवठ्यातून पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील धूतपापेश्वर ते दगडी शाळा येथे पिण्याच्या पाण्याची ८ इंच व्यासाची नवीन पाईपलाईन टाकण्यात येणार असून या विकासकामाचे भूमिपूजन माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते आज (दि. ०१ नोव्हेंबर) करण्यात आले.

यावेळी माजी उपनगराध्यक्ष श्रीनंद पटवर्धन, शहर सरचिटणीस व माजी नगरसेवक नितीन पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, राजू सोनी, माजी नगरसेविका रुचिता लोंढे, दर्शना भोईर, नीता माळी, नंदा ओझे, सुहासिनी केकाणे, अंजली इनामदार, सांस्कृतिक सेलचे जिल्हा संयोजक अभिषेक पटवर्धन, बूथ अध्यक्ष सुशांत पाटणकर, सोहन जोशी, तन्मय पटवर्धन, अदिती ओझे, महेंद्र गोडबोले, प्रशांत शेट्ये, तसेच सी जे मुनोत नगर ए विंग ते जी विंग, पुरुषोत्तम सदन, गोविंद अनंत, गुरु आशिष, आदित्य विहार, मंगल कलश, श्री स्वामी समर्थ, श्री सदन इत्यादी गृहनिर्माण संस्थेचे पदाधिकारी व रहिवासी उपस्थित होते.


पनवेल शहराचा भौगोलिक विचार करता महात्मा फुले रस्ता, टिळक रस्ता, राम गणेश गडकरी रस्ता हा परिसर पनवेल मधील अत्यंत प्राचीन परिसर मानला जातो. या परिसरात अनेक वाडे अस्तित्वात होते. कालांतराने शहरीकरणामुळे सदर वाड्यांचे रूपांतरण विविध सोसायटीमध्ये झाले, परिणामी लोकसंख्या देखील वाढली परंतु एवढ्या लोकसंख्येला पुरेसा पाणीपुरवठा योग्य मुबलक प्रमाणात होताना दिसून येत नव्हता तसेच भविष्यातील टोलेजंग इमारतींचा डेव्हलपमेंटचा विचार लक्षात घेता महात्मा फुले रस्त्यावर धूतपापेश्वर ते दगडी शाळा एवढ्या पट्ट्यात होणारा पाणी पुरवठा अपुरा आहे. सदर पट्ट्यात एक ८ इंच व एक ६ इंच व्यासाच्या दोन पाण्याच्या लाईन्स आहेत. दरम्यान कोविड काळात सदर भागातील ६ इंची च्या पाईपलाईन मध्ये .../२

## नवघर ग्रामस्थांचा प्रा.एल.बी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली सिडकोला पुन्हा एकदा उपोषणाचा इशारा

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील नवघर गाव व गाव परिसरातील विविध समस्या व ग्रामस्थांच्या मागणी संदर्भात मागील गेल्या दहावर्षा पासून रायगड भूषण प्रा.एल.बी.पाटील आणि मर्मगंध पाटील या पितापुत्रांनी सातत्याने अर्ज विनंत्या करून, सतत पाठपुरावा करून सुद्धा सिडको प्रशासनाला जाग येत नाही. सिडको प्रशासनाने जाणून बुजून नवघर ग्रामस्थांच्या समस्या व मागणी कडे दुर्लक्ष केल्याने नवघर ग्रामस्थांनी १५ नोव्हेंबर २०२२ रोजी लाक्षणिय उपोषण करण्याचा पुन्हा इशारा दिला असून झोपलेल्या सिडको प्रशासनाला जागे करण्यासाठी पुन्हा एकदा सिडको विरोधात उपोषण करण्याचा निर्धार केला आहे.

अनेक अर्ज विनंत्या करून सिडको प्रशासनाला जाग येत नाही.म्हणून दि.६ जून २०२२ रोजी नवघर ग्रामस्थांचे प्रा.एल.बी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली



नव्याने होऊ घातलेल्या१) नवघर रेल्वे स्टेशनला नवघर रेल्वे स्टेशन हेच नाव देण्यात यावे.२) नवघर ते नवघरफाटा रूग्णवाहीका तसेच छोटी वहाने येण्या-जाण्यासाठी रेल्वे क्रॉसिंग रस्ता ३) मौजे नवघर येथे होणा-या रेल्वे स्टेशनमध्ये निर्माण होणा-या नोक-या आणि व्यवसायामध्ये स्थानिक मौजे नवघर सिडको प्रकल्पग्रस्तांना प्रथम प्राधान्य द्यावे तसेच इतर मागण्यांसाठी द्रोणागिरी नोड सिडको कार्यालय बोकडवीरा येथे धरणे आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी द्रोणागिरी नोडचे आधिकारी .../२

## गाडीचा दरवाजा उघडून पाच मोबाईल फोन व रोख रक्कम केली लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आराम करण्यासाठी गाडीमध्ये झोपलेले असताना अज्ञात इसमाने गाडीचा दरवाजा उघडून पाच मोबाईल फोन व रोख रक्कम चोरून नेल्याचा प्रकार कामोठे येथे घडला आहे.

दादर ईस्ट, मुंबई येथील अनिकेत भिंगार्डे हे क्सिस बँक लोन सेंटरमध्ये सीनियर रिलेशनशिप ऑफिसर आहेत. जितेंद्र कुमार कटारिया, किशोर रवळे, पांडे हे वॅगनार गाडी घेऊन लोनच्या कामासाठी पुण्याला गेले होते. काम संपल्यानंतर रात्री मुंबई येथे येण्यासाठी गाडीने निघाले. अनिकेत गाडी चालवत होता. व तिन्ही ऑफिसर गाडीत बसले होते. यावेळी थोडा वेळ आराम करू या असे त्यांच्यात बोलणे झाले रात्री साडेतीन वाजता पुणे मुंबई लेनवर सीएनजी पंपाच्या समोर स्काय वॉकच्या खाली कामोठे येथे आले असता गाडी रस्त्याच्या बाजूला .../२

## कळंबोली शहरातील रस्त्याची दयनीय अवस्था

**दै.रायगड नगरी । पनेवल**

कळंबोली शहरातील रस्त्यांची सध्या दयनीय अवस्था झालेली आहे शहरातील विविध ठिकाणी रस्त्यांवर खड्डे व खराब रस्ते झाल्याने कळंबोलीतिल् नागरिक हौरान झाले आहेत . रस्त्यांमुळे रहिवासी त्रस्त झाले असून दुचाकी स्वरांना छोट्या मोठ्या अपघातांना सामोरे जावे लागत आहे.

कळंबोली शहरातील के एल इ कॉलेज जवळून कामोठे शहराकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठ मोठी खडी टाकून रस्ता करण्यात आलेला आहे या रस्त्यावर डांबरीकरण .../२



# गती पाविजेती

गाव आणि शहरांमधील अंतर कमी झाले की विकासाचा वेग आपोआप वाढतो. गावखेड्यातील किरकोळ दूधदुभत्यांचे थेट दुग्ध उत्पादन केंद्रांत रूपांतर होते. हे श्रेय असते दळणवळणाच्या आधुनिक साधनांचे. दुसरीकडे शहरांमधील सुविधा गावपातळीवर पोहोचल्याने लघुउद्योगांचीही व्याप्ती वाढते. महाराष्ट्रात १८ राष्ट्रीय महामार्गांखेरीज अनेक राज्य महामार्ग आहेत. ३३ हजार किलोमीटरहून अधिक लांबीच्या या रस्त्यांच्या अडचणीदेखील अवाढव्यच आहेत. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांचे काम भव्य असते. साधारण उड्डाणेही कोटींच्या घरात नेण्यासाठी ते आसुसलेले असतात. त्यांच्या कल्पकतेचा पैस इथेनॉल निर्मितीपासून आरटीओ शुल्कापर्यंत झळकतो. आवेगी घोषणांखेरीज त्यांना चैन पडत नाही. राज्यातील रस्त्यांच्या पुनर्बांधणी आणि विस्तारीकरणासाठी दोन हजार ७८० कोटींचा निधी त्यांनी मागच्या वर्षी मंजूर केला. त्यांच्या खात्यात निधीला तोटा नाही. मजबूत रस्ते, दणकट वाहने हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यांची आकडेवारी संसदेला स्तब्ध करते. २५ हजार कोटींचे रस्ते वर्षभरात बांधण्याचे शिवधनुष्यही उचलले आहे. त्यासाठी रोख्यांच्या माध्यमातून २५ लाख कोटींचा निधी उभारण्याची विशाल योजना आखली आहे. दृढ निश्चयाखेरीज हे साधणे अशक्य आहे. या झपाट्याचे एकीकडे कौतुक करतानाच प्रशासकीय अडचणींमुळे त्यांना भानावर आणण्याचे कामही लोकांना करावे लागेल. मुहूर्त आणि पूर्ततेतील तफावत लक्षात घेऊन त्यांनी नव्या घोषणा कराव्यात, हीच लोकमागणी आहे. नागपूर-पुणे महामार्गाचे अद्ययावतीकरण करून फक्त आठ तासात हे अंतर कापण्याचा संकल्प त्यांनी नुकताच जाहीर केला. गतीचा नवनिर्धार पूर्णत्वास गेला तर वाहतूकदारांना दिलासा मिळेल. प्रगतीचा वेग काय असतो याची चाहूल समृद्धी महामार्गाने सामान्यांपर्यंत नेली आहे. अशा स्थितीत नागपूर-पुणे प्रवासाचे सहा तास कमी झाले तर दळणवळण क्रांती ठरेल. सध्या या प्रवासावर चौदा तास खर्च होतात. नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाला औरंगाबादजवळ नव्या प्रस्तावित पुणे-औरंगाबाद एक्सेस कंट्रोल ग्रीन एक्सप्रेस-वे द्वारे जोडण्याचा त्यांचा मानस आहे. त्यातून मराठवाड्यातील लोकांसाठी पुण्यासह नागपूरही कवेत येईल. राष्ट्रीय महामार्गाकडून या मार्गाचे काम होणार असल्याने पुणे-औरंगाबाद प्रवास अवघ्या अडीच तासांत होईल. पुणे, अहमदनगर, बीड आणि औरंगाबाद या चार जिल्ह्यांतून हा जलदगती महामार्ग जाईल. समृद्धी महामार्गाद्वारे नागपूर-औरंगाबाद प्रवास साडेपाच तासांत पूर्ण करता येईल. अर्थात, ही किमया अपार कष्टातूनच साध्य होईल. अधिकारी आणि आंदोलक अशा दोन्ही पातळीवर केंद्र आणि राज्याला लढावे लागेल. कोणत्याही प्रकल्पाच्या मार्गात अनेक अदृश्य शत्रू असतात. प्रकल्पांच्या घोषणेनंतर ते तोंड वर काढतात. अशाच प्रकारच्या समस्यांमुळे देशातील अडीचशेहून अधिक प्रकल्पांचे काम सद्यस्थितीत रेंगाळले आहे. ढेपाळलेल्या उपक्रमांमध्ये महाराष्ट्रातील रस्ते महामार्गांचा प्रामुख्याने समावेश आहे, हे तथ्य गडकरी यांनी लक्षात ठेवायला हवे. कामातील दिरंगाईचा फटका अनेक प्रकल्पांना बसतो. शक्तिपीठ द्रुतगती महामार्गाद्वारे नागपूर ते गोवा हे अंतर दहा तासांच्या आत कापले जाईल, असा दावा आहे. ७६० किलोमीटरचा हा महामार्ग वर्धेतून सुरू होईल. सिंधुदुर्ग-गोवा सीमेवरील पत्रादेवी येथे संपेल. त्याचे काम अद्याप अपूर्णावस्थेत आहे. मुंबई-गोवा हा राज्यातील महत्त्वाचा महामार्ग म्हणून ओळखला जातो. मागील बारा वर्षांपासून 'काम प्रगतिपथावर'चे फलक तिथून निघालेले नाहीत. २०२३मध्येच हा प्रकल्प पूर्ण करण्याची ग्वाही गडकरी यांनी दिली होती. हा महामार्ग मंगलोरपर्यंत वाढविला जाणार असून सरकारी जमीन मिळाल्यास लॉजिस्टिक्स पार्क आणि ट्रक टर्मिनल स्थापन केले जाणार आहेत. ४७१ किलोमीटरच्या या महामार्गाचे साठ टक्क्यांपेक्षा अधिक काम झाल्याचे प्रशासकीय यंत्रणा सांगते. त्या संथगतीने नागरिक त्रस्त झाले असतानाच 'नागपूर-पुणे'ची नवी घोषणा झाली आहे. अशा स्थितीत जुन्या डागण्या उफाळून येऊ शकतात. त्याला तोंड देण्याची मंत्र्यांनी तयारी ठेवावी. सिमेंट रस्त्यांमुळे न होणारा पाण्याचा निचरा हे संकट वेगळे आहे. महामार्गांवरील खड्डे हा चिंतेचा विषय आहे. मुंबई-अहमदाबाद महामार्गावर हा जाच जाणवतो. भरीस भर या महामार्गाच्या प्राधिकरणाचे कार्यालय ठाण्यातून भडोचला गेले. या पार्श्वभूमीवर समृद्धी महामार्गाच्या शुभारंभाचे चौघडे निनादत आहेत. पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पणाची वर्दळ कानी येते आहे. नव्या वर्षाआधी हा सोहळा होण्याची शक्यता धूसर आहे. एकीकडे वेगाला आमंत्रित करणारे रस्ते तयार करायचे आणि त्याचवेळी महामार्गांवरील वाहन गतीवर दंड आकारायचा हे धोरण परस्परविरोधी आहे. त्याच्या विरोधात देशव्यापी ओरड आहे. हा तिढा गडकरींना सोडवावा लागेल. वाढत्या अपघातांवर नियंत्रणाचे आव्हान पेलतानाच दिरंगाईचे घात टाळले तरच 'समृद्धी' गवसेल. 'जयाचेनि नामे गती पाविजेती' हा लौकिक मंत्र्यांना साधायचा असल्यास बोभाटा टाळून महामार्गांच्या कामाच्या वेळा पाळाव्या लागतील.

# पालकमंत्री उदय सामंत यांच्या जनता दरबारात उरणच्या समस्या सोडविण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या सूचनेनुसार काल सकाळी ११:३० वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड येथे जनता दरबार आयोजित करण्यात आला होता. रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या जनता दरबारात उरणच्या विविध सामाजिक संस्था, संघटनानी, नागरिकांनी आपल्या व्यथा, समस्या पालकमंत्री उदय सामंत यांच्यासमोर मांडून उरण मधील विविध समस्या त्वरित सोडविण्याची मागणी केली आहे.



उरण तालुक्यात सुसज्ञ अशा मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटलची गरज असून वर्षानुवर्षे लोकप्रतिनिधी व शासकीय अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे उरणमध्ये अत्याधुनिक सेवासुविधा सह सुसज्ञ असे हॉस्पिटल उरण मध्ये बनू शकली नाही. उरणच्या नागरिकांना आजही उपचारासाठी वाशी, बेलापूर, पनवेल, नवी मुंबई, मुंबई या ठिकाणी जावे लागते. त्यामुळे उरण मध्ये त्वरीत सुसज्ञ असे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल बांधण्यात यावे अशी मागणी उरण सामाजिक संस्थेच्या वतीने पालकमंत्र्यांना करण्यात आली.

उरण तालुक्यातील बोकडविरा येथे जीटीपीएस प्रकल्पात अपघात झाला होता त्या अपघातातील मयत कामगांराना सरकारी नोकरी व ५० लाख रुपये मदत करा. त्या करीता स्थानिक जीटीपीएस मॅनेजमेंट कडून पाठविण्यात आलेला प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर करा.अशी मागणी जेएनपीएचे माजी विश्वस्त भूषण पाटील व सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार यांनी पालकमंत्र्याकडे केली आहे.सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार व जेएनपीएचे माजी विश्वस्त भूषण पाटील यांनी यावेळी वेगवेगळ्या समस्या पालकमंत्र्या समोर मांडले. जेएनपीए परिसरात व उरण तालुक्यातील इतर विभागात, परिसरात अपघात होउ नये, नागरिकांचे मृत्यु होउ नये या साठी सर्व्हिस रोडची निर्मिती करण्यात आली. मात्र या सर्व्हिस रोडवर दोन्ही बाजूने अवैध, बेकायदेशीर वाहने उभी केली जातात त्यामुळे नागरिकांचे अपघात होऊन आजपर्यंत ८०० हुन अधिक व्यक्तींचे विनाकारण अनेक बळी गेले आहेत. सततचे वाहतूक कोंडी व बेकायदेशीर अवैध पार्कीगच्या समस्यातून उरणकरांची सुटका करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच उरण पूर्व विभागातील शेतजमिनीत समुद्राचे खारे पाणी शेतजमिनीत घुसून शेतजमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. याकडे पालकमंत्र्याचे लक्ष वेधून समूद्रकिनारी बांधावरच पक्का रस्ता केला जावा अशी मागणी उरण सामाजिक संस्थेने पत्रव्यवहाराद्वारे तसेच प्रत्यक्ष जनता दरबारात पालक मंत्र्यांना भेटून केली. उरण मधील विविध सामाजिक संस्थांनीही तसेच अनेक नागरिकांनी आपल्या समस्या यावेळी जनता दरबारात मांडले.


## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : दुंदरे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकत / जमीन आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : दुंदरे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गाव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| दुंदरे | दिलीपकुमार फतेहलाल खरोदिया | ११/६ | ०-१६-००<br>पो.ख.०-०१-००<br>एकूण क्षेत्र ०-१७-०० | ०.२८ |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल

दिनांक : ०१/११/२०२२

**सही/-**

**ॲड.महेश भगत**

**शॉप नं.२२, कल्पतरु कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.५१, सेक्टर नं.९, खांदा कॉलनी, नवीन पनवेल-पश्चिम, ता.पनवेल, जि.रायगड**



मे.श्रीमाने साो यांचे कोर्टात

अर्जदारातर्फे वकील

ॲड.शशिकांत द. ढवळे

## जाहीर नोटीस

खालापूर येथील मे.सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६८/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.०५/१२/२०२२

सौ.संध्या रमेश गायकर — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार हिचा मुलगा कै.मुकेश रमेश गायकर राहणार मु.वाशिवली, पाताळगंगा, ता.खालापूर, जि.रायगड हा दि.२६/१०/२०२० रोजी कोकण विभाग उपजिल्हा रुग्णालय पेण येथे मयत झालेला असून त्याचे मृत्यूपश्चात त्यास हिंदू वारसा अधिनियमाप्रमाणे अर्जदार (आई) हिच प्रथम श्रेणीतील एकमेव कायदेशीर वारस असून कै.मुकेश रमेश गायकर हा अविवाहित मयत असून त्यास अर्जदाराचे व्यतिरिक्त अन्य कोणीही मुले, मुली अथवा पत्नी वारस नव्हते व नाहीत.

अर्जदार (आई) ही कै.मुकेश रमेश गायकर याची कायदेशीर वारस असल्याचा दाखला अर्जदार हिस काही शासकीय, निमशासकीय, महसूली व खाजगी कामासाठी व अन्य तद्अनुषंगिक कामाकरिता आवश्यक असून कै.मुकेश रमेश गायकर याचा वारसद-ाखला मिळण्यासाठी अर्जदार (आई) हिने दिवाणी चौकशी अर्ज क्र.१६८/२०२२ खालापूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, अर्जदार हिच कै.मुकेश रमेश गायकर याची एकमेव कायदेशीर वारसदार असून अर्जदार हिच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.१/११/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, खालापूर** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, खालापूर**


# रेशनधारकांना सर्व्हर डाऊनचा फटका ; लाभार्थी धान्यापासून वंचित

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यासह शहरातील स्वस्त धान्य दुकानदारांचे पॉझचे सर्व्हर पंधरा दिवसांपासून डाऊन असल्याने शहरातील धान्य वितरण व्यवस्था कोलमडली आहे. याचा मोठ्या प्रमाणात फटका शहरातील रेशनकार्डधारकांना बसला आहे. शेकडो नागरिकांना स्वस्त धान्यापासून वंचित राहण्याची वेळ ओढवली असून, लाभार्थी दिवाळीमध्ये धान्यापासून वंचित राहिल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

शासनाने सर्व रेशनकार्डाची नोंदणी पॉझ मशीनमध्ये आरसी नंबर केली आहे. आधार क्रमांकानुसार नोंद करून घेतली आहे. या सर्व मशीन एका लहान अँटिनाद्वारेऑनलाइन सर्व्हरने जोडल्या असतात. मागील पंधरा दिवसांपासून तालुक्यासह शहरातील सर्व्हर डाऊन असल्याने धान्य वाटपाचे काम ठप्प आहे. धान्याचा कोटा सर्व दुकानदारांनी आणून ठेवला आहे. दररोज ग्राहक दुकानात चकरा घालून खाली हाताने परत जात आहेत. ग्रामीण भागात एकूण २८, तर शहरात ४ रेशन दुकान आहे. सर्व्हरच डाऊन असल्यामुळे या रेशन दुकानांमधील मशीन शोभेच्या वस्तू ठरल्या आहेत. शासनाने संपूर्ण धान्य वाटप 'ऑनलाइन' केल्यामुळे धान्य दुकानदारांना 'ऑफलाइन' धान्यवाटप करता येत नसल्याने सामान्य जनतेमधून तीव्र असंतोष व्यक्त होत आहे.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे.माईलस्टोन कंस्ट्रक्शन तर्फे भागीदार १) श्री.अमोल सुखदेवे जरे व २) श्री.सतीश अनंत कडू ऑफिस पत्ता : शॉप नं.२, पार्थ सॉलिटीयर, प्लॉट नं.२, सेक्टर-९ ई, डी मार्ट शेजारी, कळंबोली, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड हे १) श्री.नरहरी गंगाराम पाटील, २) श्रीमती.निराबाई हरिभाऊ पाटील, ३) श्री.सदानंद शांताराम पाटील, ४) कै.श्री.सुनील शांताराम पाटील त्यांचे वारस ४/(अ) श्रीमती.बबीबाई शांताराम पाटील आणि ५) श्री.सारंग गंगाराम पाटील रा.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड यांचेकडून १००% असे त्रिपक्षीय करारनाम्याद्वारे हस्तांतरण करून घेत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**२२.५ टक्के अंतर्गत भूखंड**

| गावाचे नाव | भूखंड क्रमांक | क्षेत्र | क्षेत्र |
|---|---|---|---|
| उलवे | २८४ | २४ | ७०० चौ.मी. पैकी २०० क्षेत्र (१००%) |

कोणाही व्यक्ती / व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थाचे भूखंड संदर्भात, कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती, जसे विक्री बोजा, दान, गहाण, सरकारी, निमसरकारी, कंपनी, बक्षिस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किंवा इतर काही असलेस ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत कागद पत्रासोबत खालील पत्यावर समक्ष भेटावे.

दि.१/११/२०२२

**सही/-**

**ॲड.रेखा कि. होवाळे**

**शॉप नं.१३, प्रभात सेंटर, सेक्टर १, सीबीडी बेलापूर**

**मो.नं.८३६९०१७३६३**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## जंजिरा किल्ल्याला ब्रेक वॉटर जेट्टीची सुविधा होणार

निघाली असून, निविदा भरण्याची शेवटची तारीख २१ नोव्हेंबर २०२२ होती. पुढील दोन वर्षांत जेट्टीचे काम पूर्ण होईल, अशी माहिती मेरीटाईम बोर्डाचे अभियंता सुधीर देवरे यांनी दिली आहे.

दरम्यान, किल्लयात जाताना समुद्राच्या लाटांचा मारा होत असताना बोट काही फूट वर जाऊन काही सेकंदात खाली येते, त्यावेळी पर्यटकाला आपला तोल सांभाळून जीव मुठीत घेऊन उतरावे लागत होते. ते सुरक्षित नसल्याने किल्लयावर अद्यावत जेट्टी असावी, अशी मागणी होत होती. गेली सहा वर्षे अथक प्रयत्नांनंतर पुरतावत्व खात्याच्या अनेक परीक्षणानंतर किल्लयाच्या पश्चिमेकडे जेट्टी बनवण्याची परवानगी मिळाली. ५०० पर्यटक सुरक्षित उतरतील, अशी भव्य जेट्टी बनणार व समुद्राच्या लाटांचा प्रभाव कमी करण्यासाठी २५० फूट लांबीचा ब्रेकवॉटर (भिंत) ९३:५६ कोटी खर्चून बनवण्यात येणार आहे, अशी माहिती मेरीटाईम बोर्डाचे अभियंता सुधीर देवरे यांनी दिली.

ते पुढे म्हणाले की, सध्या पर्यटक किल्लयात जातात तो किल्लयाचा मागील प्रवेशद्वार आहे. किल्लयाचे मुख्य प्रवेशद्वार पश्चिमेला असल्याने पुरातत्त्व विभागाने व तज्ज्ञ मेरीटाईम बोर्डाच्या अधिकार्यांनी पाहणी करून समुद्राच्या लाटांची तीव्रता पाहून ही जागा निवडली आहे. पश्चिमेकडील प्रवेशद्वार मोठे व ६००/१०० फुटांचा धक्का असल्याने जेटी बनवण्यास सुलभ होईल व राजपुरीकडून दिसणार्या किल्लयाच्या सुंदरतेत कोणतीही बाधा येणार नाही. या जेट्टीचे बांधकाम मेरीटाईम बोर्डाची तज्ज्ञ टीम करणार आहे. सर्व संभाव्य त्रुटींचा विचार करून जेट्टीचे सुरक्षित व वापरण्यास सहज सोपे असे बांधकाम असेल. किल्लयाच्या पश्चिमेकडे प्रशस्त दगडी बांधकाम केलेले ग्राऊंड असल्याने पर्यटकांना तेथे बसून निसर्गरम्य विशाल समुद्राचा मनोसोक्त आनंद घेता येईल.

## परेश ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न

ड्रेनेज पाणी मिसळले गेले, ती ६ इंचाची लाईन पूर्णपणे बंद करून पूर्ण भार हा ८ इंची लाईनवर टाकावा लागला होता, त्यामुळे रुचिता लोंढे यांनी धूतपापेश्वर ते दगडी शाळा येथे ८ इंच व्यासाची नवीन पाईपलाईन टाकण्याची मागणी महानगरपालिकडे केली होती, त्या अनुषंगाने ७ लाख ८५ हजार ४१३ रुपयांच्या या कामाला मंजूरी मिळून या कामाला प्रारंभ झाला आहे. त्यानुसार सि.जे मुनोत नगर ए विंग ते जी विंग, आदित्य विहार सोसायटी,मंगल कलश सोसायटी,श्री स्वामी समर्थ सोसायटी,श्री सदन सोसायटी आणि नव्याने होऊ घातलेली गुरु आशिष सोसायटी या सर्व सोसायट्यांना होणारा पाण्याचा त्रास कायमचा संपुष्टात येणार आहे व प्रत्येक सोसायटीच्या प्रत्येक विंगला मुबलक पाणीपुरवठा होणार आहे. त्याबद्दल परिसरातील नागरिक आमदार प्रशांत ठाकूर, युवा नेते परेश ठाकूर, माजी नगरसेविका रुचिता लोंढे यांना धन्यवाद देत आहेत.

## गाडीचा दरवाजा उघडून पाच मोबाईल फोन व रोख रक्कम केली लंपास

उभी केली. व काही वेळ आराम करण्यासाठी सर्वजण गाडीमध्ये झोपले. यावेळी मोबाईल गाडीच्या चार्जिंग पॉइंटला लावले होते. साधारण पावणे पाच वाजता अनिकेतला जाग आली. त्याला पाच मोबाईल दिसून आले नाहीत. तसेच अनिकेत यांच्या पॅन्टचा उजवा खिसा कापला असल्याचे लक्षात आले. त्यांच्या खिशातून १३ हजार २०० रक्कम चोरून नेण्यात आली. व ४६ हजार २०० रुपयांचे पाच मोबाईल देखील चोरून नेण्यात आले.

## कळंबोली शहरातील रस्त्याची दयनीय अवस्था

नसल्याने दुचाकी स्लीप झाल्यानांतर गंभीर दुःखापतीला समोरे जावे लागत आहे. तेथील रहिवासी सध्या या खड्डेमय रस्त्याच्या त्रासापासून हैराण झालेलं असून याठिकाणी डांबरीकरण करून हा रस्ता लवकरता लवकर दुरुस्थ करण्याची मागणी करत आहेत. शहरात असलेल्या रस्त्यांवर मलम पट्टी केली जाते मात्र तात्पुरत्या स्वरुपाची केली जाणाऱ्या या कामामुळे मोठ्या गैरसोय वारंवार उद्भवत आहेत . या ठिकाणी असलेल्या रस्त्यांचे वारंवार डागडुजी च्या नावावर थातूर मातुर कामे केली जातात मात्र कोणत्याही प्रकारे नागरिकांच्या गैरसोई दूर होत नसल्याने मोठ्या अडचणीना नागरिक तोंड देत असतात . प्रशासनाने लक्ष देऊन संपूर्न कळंबोली शहरातील रस्त्यांची पाहणी करून चांगल्या दर्ज्याच्या ठेकेदारांकडून कामे करून घेणे गरजेचे आहे .असे रहिवासीयांचे म्हणणे आहे.

## नवघर ग्रामस्थांचा प्रा.एल.बी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली सिडकोला पुन्हा एकदा उपोषणाचा इशारा

नहाने यांनी सिडकोचे वरिष्ठ आधिकारी सेवतकर यांच्या सोबत ऑन स्पीकर फोनवर प्रा.एल.बी.पाटील सहीत नवघर ग्रामस्थांची चर्चा घडवून दिली असता प्रा.एल.बी.पाटील यांनी येथील रेल्वे स्टेशनमुळे उद्भवणा-या समस्या सिडकोचे वरिष्ठ आधिकारी सेवतकर यांना समजावून सांगितल्या असता आपल्या समस्या योग्य असून नवघर ग्रामस्थांची सिडकोच्या वरिष्ठ आधिकारी तसेच रेल्वे प्रशासना सोबत सयुक्त बैठक घेऊन योग्यच निर्णय घेण्याचे मान्य केले केले होते.

सिडको आधिकारी सेवतकर आणि नहाने यांच्या सोबत झालेल्या चर्चे नुसार तूर्तास उपोषण स्थगित करण्यात आले असता जर १५ सप्टेंबर २०२२ पर्यंत ग्रामस्थांसोबत बैठक घेऊन जर योग्य निर्णय दिला नाही तर १५ सप्टेंबर नंतर आम्ही नवघर ग्रामस्थ उग्र आंदोलन करणार असे ग्रामस्थांसहीत रायगड भूषण प्रा.एल.बी.पाटील यांनी ठणकावून सांगितले होते. असे असताना सिडको प्रशासनाला याची जाणीव नाही असेच दिसून येत आहे तसेच नवघर ग्रामस्थांच्या लाक्षणिक उपोषणाच्या वेळी झालेल्या वाटाघाटीच्या चर्चेचा सिडको प्रशासनाला विसर पडलेला दिसतोय म्हणून या गेंड्याच्या कातडीच्या सिडको प्रशासनाला झोपेतून जागे करण्यासाठी पुन्हा जेष्ठ साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते रायगड भूषण प्रा.एल.बी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली नवघर ग्रामस्थांनी १५ नोव्हेंबर २०२२ रोजी ठिक १०-३० वाजल्यापासून द्रोणागिरी नोड सिडको कार्यालय बोकडवीरा येथे लाक्षणिय(उपोषण)धरणे आंदोलन करण्याचा निर्धार केला असून खोटी आश्वासाने देणाऱ्या सिडको प्रशासनाचा जाहीर निषेध केला आहे.


## पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जि.रायगड**

**जाहीर सूचना**

**पनवेल महानगरपालिका क्षेत्रात ७ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करणेकरिता जागा / इमारत भाडेतत्वावर घेणेबाबत.**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात नव्याने ७ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करणेकरिता मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका तळमजला अथवा तळमजला + पहिला मजला वरील जागा भाडेतत्वावर घेणेकामी इच्छुक व्यक्ती / संस्था यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरच्या जागा / इमारती या बांधकाम पूर्ण असलेल्या, वाहनतळ व शौचालय या सुविधांयुक्त असाव्यात. जागा / इमारत भाडेतत्वावर घेणेचा कालावधी २ वर्षाचा असेल.

| अ.क्र. | नोड | ठिकाण | आवश्यक जागेचे क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| १ | नवीन पनवेल | खांदा कॉलनी/सेक्टर-११/१२/१३, नवीन पनवेल | १५०० ते २००० चौ.फूट |
| २ | कळंबोली | सेक्टर-१६ ई/१७/२० | १५०० ते २००० चौ.फूट |
| ३ | खारघर | देवीचा पाडा | १५०० ते २००० चौ.फूट |
| ४ | खारघर | सेक्टर-३६ | १५०० ते २००० चौ.फूट |
| ५ | खारघर | तळोजा फेज-१ | १५०० ते २००० चौ.फूट |
| ६ | कामोठे | सेक्टर-३४ | १५०० ते २००० चौ.फूट |
| ७ | कामोठे | सेक्टर-२०/२१/२२ | १५०० ते २००० चौ.फूट |

इच्छुक व्यक्ती / संस्था यांनी जागेचे ठिकाण, भाडे इ. तपशिलासह अर्ज पनवेल महानगरपालिकेत प्रत्यक्ष किंवा पनवेल महानगरपालिकेच्या panvelcorporation@gmail.com या मेलआयडीवर दिनांक १०/११/२०२२ रोजी सायं.५.०० वा. पर्यंत जमा करावेत.

**सही/-**

**उप आयुक्त**

**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.पमपा/माव्य/९९२२/प्र.क्र.३७/४५३/२०२२


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## वृद्ध महिलेच्या नातेवाईकांचा शोध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रेल्वे स्टेशनवर रोहा- दिवा शटल मेमो गाडीमध्ये बेशुद्ध अवस्थेत एक अज्ञात वृद्ध महिला आढळली असून त्या महिलेच्या नातेवाइकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस घेत आहेत.

वृद्ध महिलेचे अंदाजे वय ६५ असून उंची पाच फूट पाच इंच, अंगाने मध्यम, रंग गोरा, चेहरा उभट, केस लाल पांढरे आहे. तसेच अंगात लाल ब्लाऊज व सफेद साडी घातलेली आहे. तिला उपचारार्थ पनवेल उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आलेले आहे. तेथे महिलेला ॲडमिट करण्यात आले असून या महिलेच्या नातेवाइकांबाबत कोणाला माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे ०२२-२७४६७१२२ किंवा मोबाइल क्रमांक ८३५६०४४५३८ यावर संपर्क साधावा, असे पनवेल रेल्वे पोलिसांकडून आवाहन करण्यात आले आहे.

## इसम बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आय. आर. बी कंपनीच्या रूम मधून कोणास काही एक न सांगता एक इसम कोठे तरी निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

चरवा सोमरा उरोव (वय ४२) मु. पो. अजिवली, उंची पाच फूट सात इंच, केस काळे-पांढरे, चेहरा उभट, नाक सरळ, बांधा मध्यम असून अंगात पिवळ्या रंगाचा हाफ टीशर्ट व काळ्या रंगाचा बरमूडा तसेच पायात चप्पल आहे, तसेच त्याला हिंदी भाषा अवगत आहे सदर इसमा बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे दुरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२४४४ किंवा पोलीस हवालदार धनाजी तांडेल यांच्याशी संपर्क साधावा

## युपीएस बल्ब व शिलाई मशीनचे वाटप

**दै.रायगड नगरी । उरण**

खोपटे हद्दीतील ६० दिव्यांग व्यक्तीना युपीएस बल्ब व ५० महिला बचत गटांना शिलाई मशीन चे वाटप ग्रूप ग्रामपंचायत बांधपाडा ( खोपटे) कडून १५ वित्त आयोग, महिला व बालकल्याण तसेच दिव्यांग सेस मधून सरपंच विशाखा प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

बांधपाडा (खोपटे) ग्रामपंचायतीकडून दिव्यांग व्यक्तीना युपीएस बल्ब व महिला बचत गटांना शिलाई मशीन चे वाटप करण्यात आल्याने उपस्थितांनी ग्रामपंचायतीच्या सरपंच, उपसरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्य यांचे आभार व्यक्त केले.

## राष्ट्रीय एकता दिनानिमित्त प्रभात फेरीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

भारताचे माजी उपपंतप्रधान तथा गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त निजामपूर येथील जवाहर नवोदय विद्यालय येथे दि.३१ ऑक्टोबर रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी व्यासपीठावर विद्यालयाचे प्रधानाचार्य श्री.के.वाय. इंगळे, श्री.गणेश अडोडे, श्री.संजय माने, श्री.सतीश जमदाडे, श्री.अरविंद सिंह यादव, श्रीमती सीमा देव, केदार केंद्रेकर आदींची प्रमुख उपस्थिती लाभली. सुरुवातीला मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन तसेच सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी प्रधानाचार्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनातील प्रेरणादायक गोष्टी विद्यार्थ्यांना सांगितल्या. विद्यालयाची विद्यार्थिनी सांची माने हिने सरदार वल्लभभाई पटेल यांचे चरित्र विद्यार्थ्यांना थोडक्यात सांगितले.

त्यानंतर विद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त प्रभात फेरीचे तसेच स्वच्छता विषयक PLOG RUN या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी सीमा जोशी, स्नेहल पवार, सेहला चांदनी, अर्जुन गायकवाड, अण्णासाहेब पाटील, नम्रता काकडे, सुनील बिरादार, बंकट गवई, संदीप निकम, मुकेश सुमन, विष्णु दत्त, करन चौहान आणि सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# रायगड मधील शिक्षकांचा आझाद मैदानावर एल्गार

## शिक्षकांच्या आंदोलनाला दिला सक्रिय पाठिंबा

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

गेल्या वीस दिवसापासून उन्हातान्हाची तमान बाळगता राज्यभरातून शिक्षक आपल्या न्याय हक्कासाठी आंदोलनाला बसले आहेत. यावेळी साखळी उपोषणाचा मार्ग अवलंबून शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्यासाठी व सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आझाद मैदान शिक्षकांच्या विविध गगनभेदी मागण्यांनी दणाणून सोडले आहे. या शिक्षकांना पाठिंबा देण्यासाठी रायगड मधील खाजगी प्राथमिक शिक्षकांच्या संघटनेने ही मोठ्या संख्येने मंगळवारी दिवसभर उपस्थिती दर्शवून सक्रिय पाठिंबा दिला आहे.



राज्यातील विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांचा व शाळेमध्ये कर्मचारी कार्यरत असल्याचा प्रश्न गेल्या पंधरा ते वीस वर्षांपासून प्रलंबित आहे .अनुदानावर शिक्षक आले असताना सुद्धा काही शिक्षकांचे अनुदान कमी केल्याने शिक्षकांमध्ये शासनाविरोधात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे .शिक्षणासारखे महत्त्वाचे योगदान देणाऱ्या शिक्षकांच्या पदरी गेल्या अनेक वर्षापासून घोर निराशा मिळत आहे. गेल्या २० दिवसापासून मुंबईतील आझाद मैदान येथे राज्यभरातून आलेले विनावेतन काम करणारे शिक्षक वर्ग साखळी उपोषणाचा मार्ग अवलंबून आंदोलनावर बसले आहेत. या ठिकाणी राज्यभरातून विविध संघटनांचे शिक्षक येऊन त्यांना सक्रिय पाठिंबा दर्शवीत आहेत. मंगळवारी या आंदोलनाचा मंत्रिमंडळ बैठकीमध्ये निर्णय लागणार होता .यासाठी राज्यभरातून शिक्षकांनी आपले उपस्थिती दर्शवून शक्ती प्रदर्शनही केले. रायगड जिल्ह्यामध्ये नव्याने स्थापन झालेली रायगड जिल्हा खाजगी प्राथमिक शिक्षक शिक्षकेतर मुख्याध्यापक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनीही आझाद मैदान येथे येऊन आपला सक्रिय पाठिंबा दर्शवून आंदोलनात सहभाग नोंदवला. यावेळी संघटनेचे पदाधिकाऱ्यांसहित जिल्ह्यातून शंभर ते दीडशे शिक्षकांनी उपस्थिती दर्शवली. यावेळी राज्य शिक्षक समन्वयक संघाच्या अध्यक्षांकडे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सक्रिय पाठिंबाचे पत्र दिले.यावेळी मात्र आझाद मैदानात जमलेल्या आंदोलकांना सक्रिय पाठिंबा देणाऱ्या अन्य कर्मचाऱ्यांना ही वेगळाच अनुभव अनुभवाला आला. सक्रिय पाठिंबा दर्शवून जे शिक्षक बंधू आपापल्या घरी जायला निघाले होते त्यांना पोलीस व समन्वय समिती ने अडवून ठेवून सायंकाळी पाच वाजेपर्यंत थांबण्यास दबाव तंत्राचा वापर केल्याने पाठिंबा देण्यासाठी आलेल्या शिक्षक बांधवांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. याबाबत राज्य शासनाकडे लेखी पत्र व्यवहार करून दाद मागितली जाणार असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

# संभे ते आळंदी पायी दिंडी वारी सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

गेली २२ वर्षांची यशस्वी परंपरा राखत याही वर्षी रोहे तालुक्यातील संभे ते आळंदी पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन शनि.दि.१२ नोव्हें.ते गुरू.दि.२४ नोव्हें. या कालावधीत करण्यात आले असून पायी दिंडी पालखी पूजनाचा कार्यक्रम खा.सुनील तटकरे यांच्या तसेच अन्य मान्यवरांचे हस्ते होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

स्वा.सु.नि. अलिबागकर बाबा, गोपाळबाबा वाजे यांचःया क्रुपाशिर्वादाने व रायगड भूषण ह.भ.प.नारायण महाराज दहिंबेकर व नारायणमहाराज महाबळे यांच्या संकल्पनेने सदर दिंडीचे प्रस्थान कार्तिकी कृ.चतुर्थी ता.१२ नोव्हें. रोजी भैरीनाथ मंदिर संभे येथून स.८:३० वा.होणार असून यावेळी श्री.भैरीनाथ अभिषेक, पालखी पूजन, विणा पूजन, ध्वज पूजन, कळश पूजन, तुळस पूजन, पादुका पूजन आदी धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत. या प्रसंगी खा.सुनील तटकरे,माजी सरपंच राजेश सानप, आंबेवाडी सरपंच सुरेश महाबळे, रोहे ता.महिला अध्यक्षा प्रितम पाटील, सुनील सानप, ॲड.जनार्दन घायले, शिवराम महाबळे, विष्णू लोखंडे, संजय राजिवले,महेश ठाकूर, राकेश शिंदे, हा.पो. नि.कोलाड अजित साबळे,संजय सानप, समीर महाबळे,ॲड.महेश घातले, ऍड.समिर सानप, योगेश सानप,दिनेश सानप, मंगेश सानप, देविदास सानप आदी प्रमुख मान्यवरांचे हस्ते श्री.भैरीनाथ अभिषेक, पालखी पूजन, विणा पूजन, ध्वज पूजन, कळश पूजन, तुळस पूजन व पादूका पूजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिकविधी संपन्न करण्यात येणार आहेत.

या सोहळ्याचे यशस्वीतेसाठी अध्यक्ष तुकाराम बांदल, उपाध्यक्ष अनंत सानप, सेक्रेटरी पांडुरंग सानप, गणेश नलावडे, खजिनदार जितेंद्र दहिंबेकर, दत्ता तेलंगे, रमेश बर्डे, परशुराम कापसे, संदेश सानप, गणेश दिघे, गणेश कुर्ले, चेतन ओंबले, विलास दहिंबेकर आदि पदाधिकाऱ्यांसह सर्व सल्लागार मंडळ तसेच श्री.संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज सत्संग वारकरी सेवा मंडळ,संभे व वीर हनुमान क्रीडा मंडळ संभे अधिक मेहनत घेत आहेत.

# आदिवासी शाळेतील मुलांना स्कूल बॅगचे वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

समाजिक कार्यकर्ते किरण पाटील यांनी त्यांची कन्या कार्तिकी पाटील हीचा १३ वा वाढदिवस रायगड जिल्हा परिषद हेटवणे शाळेतील आदिवासी वाडीतील विद्यार्थी समवेत केला. मुलांना शालेय स्कूल बॅग व खाऊचे वाटप भजन सम्राट शंकुनाथ पडघेकर, विष्णू दाढावकर , मधुकर धोंगडे याच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संगीतकार व भजन सम्राट यांचा संगीतरत्न जीवनगौरव पुरस्कार देवून आदरातिथ्य सत्कार करण्यात आला.



वाढदिवस म्हटला की धूमधाम, जल्लोष आणि पार्टीत लाखोंची उधळपट्टी केली जाते. पण किरण पाटील यापासून फार अलिप्त आहेत. ते गेली अनेक वर्षापासून आपल्या कुटुंबातील अभीष्टचिंतन सोहळा आदिवासी मुलात करत आले आहेत. आपल्या कुटुंबातील व्यक्तींचा वाढदिवस निमित्त विविध क्षेत्रातील व्यक्तींचा गौरवही करत आहेत. त्यांनी आदिवासी मुले, आदिवासी शाळा, याच्या समवेत अभीष्टचिंतन सोहळा साजरा करत समाजापुढे एक आदर्श ठेवला आहे. आदिवासी मुले किंवा गरीब गरजू मुलांना आवश्यक त्या शालेय वस्तूची भेट देत आहेत. आज त्यांनी आपली मुलगी कार्तिकी हीचा वाढदिवस निमित्त आदिवासी शाळेतील विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते स्कूल बॅग व खाऊचे वाटप करण्यात आले. संगितरत्न गुरूवर्य शंकुनाथ बुवा पडघेकर, गुरुवर्य पद्माकर बुवा खारघरकर , विष्णू बुवा दाढावकर, गुरुवर्य मधुकर बुवा धोंगडे , अँड.सुरज गोंधळी ह्यांना संगीतरत्न जिवन गौरव सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ देवून गौरविण्यात आले. यावेळी कामगार नेते प्रकाश म्हात्रे, रायगड जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष हेमराज म्हात्रे, ह भ प बाळाराम बुवा पाटील, पत्रकार विकास पाटील , उपसरपंच नागेश गीरा, शाळेचे मुख्यधापक जाधव सर, तसेच शाम चौधरी, निलेश चोरमेकर, निलेश पाटील, उत्तम गोधंळी, रामदास टेंबे, अक्षय पाटील , पंकज कोपरकर, अमित पाटील , संगम पाटील, ऊज्वला पाटील, मनाली पाटील, जगन पाटील अदी मान्यवर उपस्थित होते.

# माथेरान मधील क्ले पेव्हरच्या रस्त्यांमुळे पर्यटकांचा प्रवास सुखकर

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान हे पर्यावरण दृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित झाल्यानंतर नवीन कामांना बंदी घालण्यात आली होती. रस्त्याची कामे करताना आजूबाजूला असणारी दगड मातीचे सुध्दा उत्खनन करता येत नव्हते त्यामुळे दरवर्षी इथे मोठया प्रमाणावर पर्जन्यवृष्टी होत असल्याने मातीची प्रचंड प्रमाणात धूप होत होती. आणि धुळीच्या रस्त्यामुळे खूपच त्रास सहन करावा लागत होता. याकामी धूळ विरहित रस्त्याला पर्याय म्हणून सनियंत्रण समितीने क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांना मान्यता दिल्यामुळे मातीची होणारी धूप काहीअंशी कमी झाली आहे आणि ब्लॉकच्या रस्त्यावरून अगदी सहजपणे आपले सामान ओढून नेण्यासाठी पर्यटकांना सोयीस्कर बनले आहे.

सध्यातरी दस्तुरी पासून या रस्त्यांची कामे रेल्वे स्टेशन पर्यंत पूर्ण होत आहेत पूढेही अशाचप्रकारे पांडे रोड पर्यंत क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांचे काम लवकरच अपेक्षित आहे त्यामुळे एकप्रकारे इथे धुळीला थारा मिळणार नाही. आजवर धुळीच्या त्रासाने येथील व्यापारी वर्गांच्या मालाचे मोठया प्रमाणावर नुकसान होत होते आणि याच धुळीमुळे दमा, क्षय,थकवा अशा विविध आजारांचा सामना करावा लागत होता.मागील काही वर्षांपूर्वी महात्मा गांधी मार्ग हा मुख्य रस्ता पेव्हर ब्लॉकने बनविण्यासाठी सुरुवात केली होती परंतु त्यावरून घोडे घसरून पडतील अशीच काहीशी भीती येथील घोडेवाल्यांना वाटत असल्याने त्यावेळेस घोड्याना चालण्यासाठी रस्त्याच्या मधोमध जुनाच मातीचा रस्ता ठेवण्यात आला होता परंतु सद्यस्थितीत पाहता हेच घोडे पेव्हर ब्लॉक वरून सुसाट धावत असतात आणि नागरिकांना पर्यटकांना मातीच्या रस्त्यावरून पायपीट करावी लागत आहे. आजच्या घडीला पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यामुळे पर्यटकांना आपल्या सामानाच्या वाहतुकीसाठी अवाजवी रक्कम देण्याऐवजी ते अगदी सहजपणे आपल्या बॅगा ओढून नेत आहेत.


मा.इंदलकर सो

अर्जदारातर्फे वकील
ॲड.गुरुनाथ डी. भगत

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी सो.वर्ग १ यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.११४२/२०२२
नि.नं.७
ने.ता.०३/१२/२०२२

श्री.मयुरेश मधुकर चातुर्य
वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.५०२, टॉवर-१७, अमरांते, से.९ ई,
प्लॉट नं.४, कळंबोली, डी मार्ट जवळ, पो.कळंबोली,
ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२१८
मो.नं.९८२१२४०९५९ अर्जदार

विरुद्ध

निबंधक जन्म मृत्यू नोंदणी
कळंबोली विभाग
महानगरपालिका पनवेल
कळंबोली, पो.कळंबोली, ता.पनवेल,
जि.रायगड, पिन नं.४१०२१८ सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री.मयुरेश मधुकर चातुर्य, रा.फ्लॅट नं.५०२, टॉवर-१७, अमरांते, से.९ ई, प्लॉट नं.४, कळंबोली, डी मार्ट जवळ, पो.कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड, पिन-४१०२१८ यांनी त्यांच्या जन्माच्या नोंदीचा आदेश मिळण्यासाठी फौजदारी न्यायालय पनवेल फौ.चौ.अर्ज नं.११४२/२०२२ अर्ज दाखल केला असून सदर अर्जाला अनुषंगून जन्माच्या नोंदीबाबत कोणासही कोणत्याही स्वरुपाची हरकत घ्यावयाची असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत मा.न्यायालयात हजर होवून हरकत घ्यावी. सबब सदर काळात कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार योग्य तो आदेश अर्जदाराचे लाभांत देवून अर्ज निकाली काढून नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २०/१०/२०२२

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.पनवेल**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल स्वरज्योत ग्रुप तर्फे भागीदार श्री.सुनील मोहन वाघपंजे वगैरे कार्यालयीन पत्ता : शॉप नं.१३२, पहिला मजला, महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड स्वतःकरिता व नियोजित स्वरज्योत गृहनिर्माण संस्था-नेरे यांचे इतर सहभागीदार यांचेकरिता खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मुळ मालक श्री.भगवान नारायण पाटील व श्री.वसंत नारायण पाटील दोघेही रा.नेरे, ता.पनवेल, जि.रायगड यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदीकराराने घेण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नेरेपाडा, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | मालकाचे नाव | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| २८ | ३/अ/१ | ०-५२-७० पो.ख. ०-०८-८० एकूण ०-६१-५० | १) भगवान नारायण पाटील २) वसंत नारायण पाटील | १०.९६ |

वर वर्णन केलेली मिळकत महसूली गाव नेरेचा भाग असताना सदर मिळकतीचा क्र.२०१/३ असा होता. सदर मिळकत नवीन महसूली गाव नेरेपाडामध्ये समाविष्ट झालेनंतर सदर मिळकतीचा क्र.२८/३/अ असा झाला आणि आत सदर मिळकतीचा क्र.२८/३/अ/१ असा आहे.

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा विकसन करार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०१/१/२०२२

**सही/-**
**ॲड.ज्ञानेश्वर श्रीनिवास कुळकर्णी**
**२१, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, पनवेल-४१०२०६, जि.रायगड**



मा.गुन्नाल साहेब कोर्ट

ॲड.जॉय बी. शाह

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१४४५/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१४/१२/२०२२

१) श्रीमती.ताराबाई गु. मढवी
वय : ५४ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.११८, सिद्धी करवले, ता.पनवेल
२) सौ.उषा विठू पाटील
वय : ४९ वर्षे, धंदा : शेती
३) सौ.निशा विठू पाटील
वय : ४७ वर्षे, धंदा : शेती
४) श्री.संदीप विठू पाटील
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती
५) यज्ञेश्वर विठू पाटील
घर नं.५६१, रोहिंजण, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी कै.विठू मुंगा पाटील घर नं.५६१ रोहिंजण, ता.पनवेल, जि.रायगड येथील कायमचे रहिवासी होते व ते दि.२४/२/२०१७ रोजी रोहिंजण, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्याअर्थी अर्जदार क्र.१ ते ५ यांनी ते कै.विठू मुंगा पाटील यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**जुना मालमत्ता क ६१, बिल्डींग नं.३३७, सेक्टर TPRHK एरिया १४४ चौ.मी., रोहिंजण, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील अर्जदार क्र.१ ते ५ हे मयत कै.विठू मुंगा पाटील यांचे वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.विठू मुंगा पाटील यांचे वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यास वारसदाखला मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.१/११/२०२२ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**



श्री.मुजावर सो

ॲड.अजित धनराज म्हात्रे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१५१८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१२/१२/२०२२

१) श्रीमती.कमलावती सुरेश म्हात्रे
वय : ६३ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.सुरज सुरेश म्हात्रे
वय : ३५, धंदा : नोकरी
१ ते २ रा.घर नं.७८०, दत्त मंदिर जवळ,
ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.रंजनी हेमंत भोईर
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.तुरमाळे, पो.शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.करिश्मा अमित म्हात्रे
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फुंडे, पो.बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील कै.सुरेश चांगदेव म्हात्रे हे दि.१३/०२/२०२० रोजी मौजे : ओवळे, पो. पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच त्यांच्या आई कै.द्रोपदी चांगदेव म्हात्रे या मयत असून त्यांच्या मृत्यूची तारीख अर्जदार यांना माहित नाही.

कै.सुरेश चांगदेव म्हात्रे यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड**
**मौजे : सिडको फाईल नं.ओवळे-१२६**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| ओवळे-१२६ | ५८ | २/B | ०-०२-० |
| | ५९ | ४ | ०-०३-७ |
| | १८ | ०३ | ०-१३-०४ |
| | ६३ | ७ | ०-१६-० |
| | २० | ६ | ०-०९-६ |

सदर मिळकती मोबदल्यात सिडकोने खालीलप्रमाणे भूखंड देण्यात आले आहे.

| गाव | प्लॉट नं. | सेक्टर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक | ३ अे | ४ | ७०० चौ.मी. |

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.सुरेश चांगदेव म्हात्रे यांचे वारसदार या नात्याने कै.सुरेश चांगदेव म्हात्रे यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे २२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.सुरेश चांगदेव म्हात्रे यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.०१/११/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## नवीन पनवेलच्या रहिवाशांना कमी दाबाने पाणीपुरवठा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नविन पनवेल परिसरातील सेक्टर ८, १०, १२, १३, १८, येथे मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईचा सामना दररोज नागरिकांना करावा लागत असताना दुसरीकडे नवीन पन-वेल सेक्टर १७ येथील मंगलमूर्ती रोज बाजार फेरीवाल्याना महानगरपालिकेचा कुठलाही खाद्यपदार्थ विक्रीचा परवाना नसतानाही सिडकोच्या पाणीपुरवठा विभागातून नळाचे कनेक्शन दिल्यामुळे रहिवासींकडून संताप व्यक्त केला जात आहे.

येथील फेरिवाल्यांना सिडकोने तात्पुरत्या स्वरुपात रोजबाजारसाठी काही अटी व शर्तीवर रोज रोजबाजार फेरीवाल्या संस्थेला जागा उपलब्ध करून दिली आहे. या जागेच्या उद्देशाला हरताळ फासत या फेरीवाल्यांनी बहुतांशी टपऱ्यामध्येच बेकायदेशीर खाद्यपदार्थ विक्री केली जात आहे. या फेरिवाल्यांना महापालिकेच्या परवानासाठी नोटीसा देऊन सुध्दा कारवाई होत नाही. तर दुसरीकडे या परिसरात पाण्याची कमतरता असताना येथिल रहिवाशांना कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. तसेच सिडको पाणीपुरवठा अधिकारी मात्र आर्थिक लांगेबांधे करुन नविन नळाचे कनेक्शन देत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

याबाबत नविन पनवेल सिडको पाणीपुरवठा अधिकारी सागर जगदाले यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी फोन उचलला नाही. सर्वसामान्य नागरिक दुहेरी कर भरत असताना त्यांच्या नळाला पाणी येत नाही तसेच महापालिकेकडून मूलभूत सुविधा मिळत नाही. मात्र दुसरीकडे राजकीय वरदहस्त असल्यामुळे या फेरिवाल्यांना सर्व सुविधा मिळत आहेत. असे येथिल जेष्ठ नागरिकांकडून बोलले जात आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# मानाच्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेला शुक्रवारपासून होणार प्रारंभ

## विजेत्या एकांकिकेला ०१ लाख रूपये आणि मानाचा अटल करंडक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने यंदाही मानाची अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका' स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे यंदा नववे वर्ष आहे. स्पर्धेचे मुख्य प्रायोजक ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लिमिटेड तर सहप्रायोजक नील ग्रुप आहे.

नाटय चळवळ वर्द्धींगत करण्यासाठी व नाटय रसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वर्द्धींगत व्हावा, यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृहनेते व नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी 'अटल करंडक एकांकीका' या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व निटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परिक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्य रसिकांच्या गळयातील ताईत बनली. दरवर्षी या स्पर्धेला राज्यातील कलाकार आणि प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभत असतो. त्यामुळे हि स्पर्धा राज्यात नावाजली असून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना यंदाही भरघोस रक्कमेची पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला शुक्रवारपासून विभागनिहाय प्रारंभ होणार आहे. त्यानुसार पुणे केंद्रावर ४ व ५ नोव्हेंबरला, सातारा केंद्र ०६ नोव्हेंबर, रत्नागिरी ०८ नोव्हेंबर, जळगाव व नागपूर केंद्र १२ नोव्हेंबर, नाशिक १३ नोव्हेंबर, रायगड (पनवेल) १९ व २० नोव्हेंबर, मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली केंद्रांची प्राथमिक फेरी २४ ते २७ नोव्हेंबर रोजी होणार आहे, तर अंतिम फेरी ०२ ते ०४ डिसेंबर २०२२ रोजी पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे.

# रस्त्यावरचे खडे भरण्यास सरकारची उदासिनता

**दै.रायगड नगरी । रोहा**

कायम रहदारी असणाऱ्या गोवा महामार्गावर व पुई म्हईसदरा पुलावर ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे रस्त्याची अक्षरक्ष: चालण झाली आहे.या खड्यांची दखल शासन घेत नसल्याने येथूनच जवळ असलेल्या पुई ग्रामस्थांनी स्वखर्चातुन पुई हद्दीत पडलेले खडे भरले आहेत. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा प्रवास काही काळ तरी सुखकर होणार आहे.

पुई ग्रामस्थांनी केलेला निर्धार व एकजुटीच्या जोरावर सदरील ठिकठिकाणी पडलेले खड्डे बुजविण्यात आले आहेत. यावेळी माजी सरपंच संजय मांडलुस्कर, सुनील दळवी, चंद्रकांत लहाने, अशोक धामणसे, प्रविण धामणसे, शरद दिसले, दर्शन मांडलुस्कर, शशिकांत दिसले, मधुकर दिसले, प्रसाद गायकवाड, सिद्धार्थ गायकवाड, सुभाष दिसले, सुधाकर दिसले, प्रसाद येरूणकर, चंद्रकांत फाटे, उमाजी अमृस्कर, प्रफुल्ल धामणसे, चंद्रकांत दळवी, उल्हास पाटील, महेश मानकर, प्रल्हाद भोईर, सुबोध पडवळ, शंकर दिवेकर, आत्माराम दिवेकर, वामण कदम, राकेश महाडिक आदी प्रमुख ग्रामस्थ उपस्थित होते.

मुंबई गोवा महामार्ग हा क़ायमच रहदारीचा असून या महामार्गावर रोजच वाहनाची वर्दळ असते.या वर्दळीच्या मार्गावर निकृष्ठरित्या बनवलेल्या रस्त्यामुळे कोलाड़ ते खांब हद्दित रस्त्याची अक्षरक्ष: चालण झाली आहे. या पडलेल्या खड्यांमुळे व खड्डे चुकविण्याच्या नादात वाहनचालकांचे किरकोळ तसेच गंभीर स्वरूपाचे अपघातही झाले आहेत. तर याच मार्गावर अनेक प्रवाशांना नाहक आपला जीव गमवावा लागत आहे. हा जीव जात असतांना खासदार आमदार, मंत्री फक्त गणेश उत्सव काळात दिखावा करत जनतेची दिशाभूल करीत तात्पुरता मलम पटी करून खडे भरण्याच्या सूचना देतातं. व गणपती होताच परत फिरकत नाहीत.

आता देखील या मार्गावर प्रचंड खडे पडले असून या खड्याची दखल शासन घेत नसल्याने पुई येथील ग्रामस्थांनी स्व खर्चातुन पुई हद्दीत पडलेले खडे भरले असल्याने त्यांच्या या समाजसेवेच्या कार्याचे सर्वत्र स्वागत होताना दिसत आहे.

# सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेची कालमर्यादा दोन महिन्यांवरून १४ दिवसांचा करावा

## पनवेल - सिडको सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ मर्यादितची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेची कालमर्यादा दोन महिन्यांवरून १४ दिवसांचा करण्यात यावा, अशी मागणी राज्याचे सहकार मंत्री अतुल सावे यांच्याकडे पन-वेल - सिडको सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ मर्यादितच्या वतीने कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.



या संदर्भात आज (दि. ०१ नोव्हेंबर) नामदार अतुल सावे यांना निवेदन देण्यात आले आहे. यावेळी पनवेल - सिडको सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ मर्यादितचे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष कुंडलिक काटकर, संचालक बाळासाहेब पडवळ आदी उपस्थित होते. यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात म्हंटले आहे कि, २५० पेक्षा कमी सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणूका हया म. स. सं . अधिनियम १९६० चे कलम ७३ कब व निवडणूक नियम ७६ नुसार घेण्यात येत असून सदरच्या निवडणूक प्रक्रियेसाठी लागणारा कालावधी हा सुमारे दोन महिन्याचा आहे. सदरची निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कामकाज पहाणाऱ्या व्यक्तींना मानधन ७५०० रुपये देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

सदरचे मानधन हे दोन महिन्याचे कालावधीसाठी कमी असल्याने निवडणूक अधिकारी २५० पेक्षा कमी सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी नाखुश दिसत आहेत. त्यामुळे, २५० पेक्षा कमी सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणूका मुळ निवडणूक नियम ७६ (जुना पध्दतीने म्हणजे १४ दिवसाची नोटीस देऊन अधिमंडळाच्या सभेत निवडणूक पूर्ण करणे) नुसार घेण्याबाबत योग्य ते बदल व्हावेत. असा बदल झाल्याने संस्थाच्या खर्चात बचत होईलच त्याच बरोबर निवडणूक अधिकाऱ्यांना सुध्दा योग्य मानधन मिळेल व कमी वेळेत निवडणूका पार पडतील. त्या अनुषंगाने निवडणूक नियम क्र. ७६ योग्य ती तरतूद करण्यात यावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# गुरांच्या कत्तल प्रकरणी गुन्हेगारांवर कठोर कारवाई करा

## नऊगांव आगरी समाजातर्फे मुरुड तहसीलदार व पोलीसांना निवेदन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील घडलेल्या गोवंश हत्या प्रकरणी गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी नऊगांव आगरी समाजाने केली असून याबाबतचे एक निवेदन मुरुड तहसीलदार व पोलीसांना देण्यात आले असून याविरोधात वेळप्रसंगी आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.





गुरुवार दि. २७/१०/२०१२ रोजी गांव पारगाण, ता. मुरुड जंगलात बैल व गायी कापल्या असल्याचे तसेच त्याबाबत मुरुड पोलीस स्टेशन येथे याबाबत संबंधीत शेतकऱ्यांनी तक्रारी दिल्याबाबत आमच्या नऊ गांव आगरी समाजाकडे दाद मागण्यांत आली आहे. त्यावरुन तसेच मुरुड तालुक्यातील अनेक गावांमधील अनेक गुरे अवैधरित्या पळवून ती कापून मटण विक्री करणे, असे बेकायदेशीर कृत्य होत आहे. त्यानंतर पोलीसांत तक्रार दिल्यानंतर अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या गुन्हेगारांस शोधून त्यांच्या विरुद्ध गोवंश हत्या बंदी कायदया अंतर्गत फौजदारी कारवाई होणे गरजेचे आहे. अन्यथा अशा घटना वारंवार होत राहील्यास हिंदू समाजात असंतोष निर्माण होईल. अशा परिस्थितीत या अशा घटनांमुळे हिंदू समाजात चिंता निर्माण झाली आहे. पुन्हा गायी व बैल कापण्याची घटना घडली तर जातीय तणाव निर्माण होईल.

सदर गुरे चोरी झाल्याबाबत संबंधीत शेतकऱ्यांनी तक्रारी अर्ज दाखल केले होते. सदर तक्रारी अर्जाबाबत मुरुड पोलीस स्टेशन येथे गेलो असता संबंधीत पोलीसांनी तुमची गुरे जंगलात चरायला का सोडता? तुमची गुरे तुम्हाला घरी चांधून सांभाळता येत नाहीत का? अशा प्रकारच्या तक्रारी केल्यास तुमचेवर कारवाई केली जाईल, असे संभाषण करुन शेतकऱ्यांना पोलीसी धाक दाखवित आहेत.

शासनानी गुरे चारण्यासाठी गुरचरण का ठेवण्यांत आले आहेत. संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांना अशा प्रकारचे धाक दाखविणे योग्य आहे का? याचा देखील विचार करणे आवश्यक आहे. तसेच ज्या पारगाण येथील जंगल भागात घटना घडल्याचे आढळून आले, त्या जंगलात आमच्या नऊ गाव शिघ्रे नवीवाडी, शिघ्रे, वाणदे या भागातील महिला लाकूड सर्पण गोळा करण्याकरीता तसेच मोलमजूरीकरीता जात-येत असता, त्यामुळे त्यांच्यामध्ये भिती व दहशत निर्माण झाली आहे. तसेच अशाप्रकारच्या समाज कंटकांकडून त्यांना धोका निर्माण झाला आहे. मुरुड पोलीस स्टेशन यांना दोन आर-ोपींना पकडण्यांत यश आले आहे. परंतु इतर आरोपी मोकाट आहेत. तरी त्यांना तात्काळ जेर बंद करुन या कत्तलीमध्ये वापरण्यांत आलेली साधान सामुग्री व वाहन जप्त करणेबाबत तातडीने उपाय योजना व संबंधीतांवर गुन्हा दाखल करुन कडक कायदेशीर कारवाई करण्यांत यावी. तसेच मध्यंतरीच्या काळात मुरुड तालुक्यांत ज्या ज्या ठिकाणी गोवंश हत्या कारण्याचे प्रकार घडून ज्या स्थानिक शेतकऱ्यांची गुरे चोरून नेऊन कत्तल करुन ज्यांचे ज्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, त्यांना योग्य ती नुकसान भरपाई मिळावी.

पोलीस स्टेशन मुरुड व तहसीलदार मार्फत कोणतीही ठोस कायदेशीर कारवाई न झाल्यास व संबंधीत सर्व आरोपींचा पुढील पंधरा दिवसांत तात्काळ शोध न घेतल्यास वरीलप्रमाणे आम्हा नऊ गांव आगरी समाज संघटनेतर्फे जनआंदोलन छेडण्यांत येईल व त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपणांवर राहील. असा इशारा देण्यात आला आहे.

# उरण येथील स्वातंत्र्यवीर सावरकर मैदानात कचऱ्याचे साम्राज्य

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण शहरातील मुलांना खेळण्यासाठी आरक्षित केलेल्या एकमेव स्वातंत्रवीर सावरकर मैदानावर सध्या कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. त्यात जास्तीत जास्त प्लास्टिक कचरा दिसून येत आहे. अत्यंत घाण व दुर्गंधीयुक्त झालेल्या या खेळाच्या मैदानाकडे मुलांनी पाठ फिरवली असून सध्या हे खेळाचे मैदान कचरा युक्त झाले आहे.

तरी उरण नगर पालिकेच्या स्वच्छता दूतानी या मैदानाकडे लक्ष केंद्रित करावे अशी मागणी खेळाडू करत आहेत

उरण नगरपालिका हद्दीत फक्त स्वातंत्र्यवीर सावरकर हे एकच मैदान खेळाचे मैदान म्हणून आरक्षित आहे. या मैदानावर विविध शालेय मैदानी खेळाच्या स्पर्धा, फुटबॉल, कबड्डी स्पर्धा यांचे आयोजन केले जाते. त्याचबरोबर शहरातील मुले या मैदानात नेहमी खेळण्यासाठी येतात. मात्र सध्या या मैदानावर कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे.या कचऱ्यामुळे या मैदानावर कसे खेळतील अशी परिस्थिती दिसून येत आहे.

संध्याकाळ होताच या मैदानात दारुडे व गर्दुले आपले बस्तान मांडतात. पर्यायाने दारूच्या रिकाम्या झालेल्या बाटल्या मैदानातच फोडून फेकून देतात त्यामुळे या मैदानात सर्वत्र काचांचे साम्राज्य पसरलेले दिसून येत आहे. अशा काचामुळे खेळाडू जखमी होत आहेत. तरी उरण नगर पालिकेच्या मुख्याधिकारी राहुल इंगले यांनी जातीने लक्ष केंद्रित करुन या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पुढाकार घ्यावा तसेच दारुड्याना हे मैदान बंद करावे अशी मागणी खेळाडू करत आहेत.



# दोघा बांधकाम व्यावसायिकांच्या छळवणुकीमुळे एकाची आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बांधकाम साहित्याचा पुरवठा करणाऱ्या दीपक काटबू (४०) याने मुंब्रा येथील दोघा बांधकाम व्यावसायिकांच्या छळवणुकीमुळे पनवेलमधील एका हॉटेलमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे उघडकीस आले आहे. काटबू याने आत्महत्या करण्यापूर्वी मोबाईलवरून काढलेल्या व्हिडीओवरून हा प्रकार उघडकीस आला आहे. त्यानुसार पनवेल शहर पोलिसांनी अब्दुल मुकीम अब्दुल रहमान अन्सारी व वसीम या दोन बांधकाम व्यावसायिकांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

दीपक काटबु हा दहीसर मोरी परिसरात राहत होता. त्याचा बांधकाम साहित्याचा पुरवठा करण्याचा व्यवसाय होता. शिळफाटा येथील मुनीर कंपाऊंडमध्ये अब्दुल मुकीम अब्दुल रहमान अन्सारी आणि वसीम या दोघांनी गेल्या काही महिन्यापासून बेकायदा बांधकामाला सुरुवात केली होती. याच साईटवर दीपक हा काही महिन्यांपासून बांधकाम साहित्याचा पुरवठा करत होता. त्यांच्याकडून दीपकला १७ लाखांपेक्षा जास्त रक्कम येणे बाकी होते. त्यामुळे दीपक त्यांना वारंवार संपर्क करत होता. मात्र बबलू आणि वसीम या दोघांनी त्याचे फोन घेणे बंद केले होते. देणेकरी दीपककडे पैसे मागत असल्याने मागील काही दिवसांपासून तो मानसिक तणावाखाली आला . त्यामुळे अस्वस्थ झालेला दीपकने हॉटेलच्या रुमवर गळफास घेऊन आत्महत्या केली. पनवेल शहर पोलिसांनी त्यावेळी आकस्मात मृत्यूची नोंद करुन या प्रकरणाचा तपास सुरु केला होता. दीपकने मृत्यूपूर्वी आपल्या मोबाईलवर व्हिडीओ काढल्याचे त्याच्या कुटुंबीयांच्या निदर्शनास आले. न या व्हिडीओमध्ये दीपकने अब्दुल मुकीम अब्दुल रहमान अन्सारी आणि वसीम या दोघांनी त्याला बांधकाम साहित्य पुरवठा केलेल्या मालाचे १७ लाख रुपये न दिल्याने आत्महत्या करत असल्याचे म्हटले आहे. याप्रकरणी दीपकच्या कुटुंबीयांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अब्दुल मुकीम अब्दुल रहमान अन्सारी आणि वसीम या दोघांविरोधात तक्रार दाखल केली.

# पोलीस ठाण्यात व्हिडीओ काढून इंस्टाग्राम वर प्रसारित करणारा आरोपी गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पोलीस ठाण्यात पोलीस अधिकारी उपस्थित नसल्याचा फायदा घेत अधिकाऱ्याच्या खुर्चीवर बसून आणि खुर्ची मागे असलेला महाराष्ट्र पोलिसांचा लोगो व स्वतःचा व्हिडीओ तसेच पिस्टल हातात घेऊन हवेत फिरवत असल्याचाही व्हिडीओ इंस्टाग्राम वर प्रसारित करणाऱ्या एका इसमाला पोलिसांनी अटक केली आहे आहे.

मोसिन शेख आहे या आरोपीचे नाव आहे. याने त्याचे ट्विटर अकाऊंटवरुन एक इसम पोलीस ठाण्यामध्ये पोलीस अधिकारी यांचे खुर्चीमध्ये बसुन, खुर्चीचे मागे असलेला महाराष्ट्र पोलीसचा लोगो व स्वतःचा व्हिडीओ काढुन तो इन्स्टाग्रामवर प्रसारीत केला आहे. तसेच सदर इसम हातात पिस्टल धरून ते हवेत फिरवित असल्याचा व्हिडीओ इन्स्टाग्रामवर प्रसारीत केला आहे. त्याबाबत दोन्ही व्हिडीओ मोमिन शेख यांनी पोलीस आयुक्तालयाचे ट्विटर हॅन्डलवर पाठविलेले आहेत. सदर इसमाने कोणत्या पोलीस ठाणेत सदरचा व्हिडीयो काढला आहे याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक शेखर बागडे यांनी तपास पथकामार्फत सदर बाबीचा शोध घेतला असता, सदर व्हिडीओमधील व्यक्ती ही डोंबिवली मध्ये राहणारा सुरेंद्र पांडुरंग पाटील हा आहे. तसेच तो महाराष्ट्र नरबळी व अंधश्रध्दा निर्मुलन कायद्यामधील फिर्यादी असुन, सदर गुन्हयाचा तपास मानपाडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकृष्ण गोरे हे करीत आहेत. श्रीकृष्ण गोरे यांनी सदर गुन्हयाचे तपासात आरोपींना अटक करुन त्यांचेकडुन १९ लाख ९६ हजार रुपये जप्त केले आहेत.

सदरची रक्कम ही सुरेंद्र पांडुरंग पाटील उर्फ चौधरी याची असल्याने, न्यायालयाचे आदेशानुसार सदरची रक्कम ही फिर्यादी यांना परत करण्याचे आदेश निर्गमित झाले होते. त्याप्रमाणे सुरेंद्र पांडुरंग पाटील उर्फ चौधरी हा त्याची रक्कम घेणेसाठी २५ ऑक्टोबर २०२२ रोजी मानपाडा पोलीस ठाण्यात आला होता. त्योवळी श्रीकृष्ण गोरे हे सुरेंद्र पाटील याचे रकमेचे संबधाने त्यांचे कक्षातुन मुद्देमाल कक्षात गेले असता, त्यांचे कक्षात सुरेंद्र पाटील याने कोणीही अधिकारी व अंमलदार नसल्याचा फायदा घेवुन कक्षातील अधिकारी यांचे खुर्चीवर बसुन, खुर्चीचे मागे असलेला महाराष्ट्र पोलीसचा लोगोचा व स्वतःचा व्हिडीयो काढला आहे. तसेच त्याने पडघा, भिवंडी व अंजुरफाटा, भिवंडी या ठिकाणी त्याचे मित्रांचे घरी पार्टी करताना त्याचे हातात त्याचे परवानाधारक पिस्टल घेवुन ते हलगर्जीपणाने हातात फिरवुन त्याबाबतचा व्हिडीओ काढुन इन्स्टाग्राम अकाऊंटवर शेअर केल्याचे तपासात आढळुन आल्याने, सुरेंद्र पांडुरंग पाटील उर्फ चौधरी याचेविरुद्ध मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात आरोपीत सुरेंद्र पांडुरंग पाटील उर्फ चौधरी यास अटक करण्यात आली आहे.

तसेच परवाना धारक शस्त्र आणि ५ जिवंत काडतुसे असा ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दरम्यान सुरेंद्र पांडुरंग पाटील उर्फ चौधरी याची मर्सिडीज कार क्रमांक एम.एच.०५ ई.टी. ७८८८ ची पंचासमक्ष तपासणी केली असता, त्यात एक बेकायदेशिर कुकरी मिळुन आलेली आहे. त्याबाबत आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्हयात एक कुकरी व मर्सिडीज कार असा ६५ लाख २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच या आरोपीविरुद्ध मानपाडा, कोळशेवाडी व महात्मा फुले पोलीस ठाणेत एकंदर ७ गुन्हे दाखल आहेत.